


# ज्ञान प्रबोधिनी
## शैक्षणिक साधन केंद्र


## ई - प्रशिक्षक

वर्ष ३: अंक २ नोव्हेंबर २०१५

### नेतृत्वगुण विकसनासाठी अनुभव शिक्षण

### स्मृतीतून स्फुरो कृती

### “विचार - स्मरण”



# संपादकीय

सस्नेह नमस्कार

गेली काही वर्षे ज्ञान प्रबोधिनीद्वारे 'प्रज्ञा विकास कार्यक्रम' योजले जातात. माध्यमिक शाळांमधून सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांसाठी सर्वसामान्य अभ्यासक्रम शिकविला जातो. (Broad based general curriculum) विद्यार्थ्यांच्या क्षमता, रुची, कल, इत्यादिंचा विचार करता काही वेळेला विशेष उपक्रमांची योजना करणे गरजेचे असते. अनेक देशांमध्ये असे enrichment programs कार्यान्वित केलेले असतात. विद्यार्थ्यांच्या विशेष बौद्धिक क्षमता विकसित करण्यासाठी अशा कार्यक्रमांचा उपयोग केला जातो. निरीक्षण क्षमता, आकलन क्षमता, समस्या परिहार करण्याच्या क्षमता यासारख्या बौद्धिक क्षमता विकसित करण्याच्या पद्धती आणि तंत्रे ज्ञान प्रबोधिनीत संशोधनाअंती सिद्ध झाली आहेत. या पद्धती आणि तंत्रांचा उपयोग प्रबोधिनीने ग्रामीण प्रज्ञा विकास कार्यक्रमात केला आहे. सध्या असे कार्यक्रम सोलापूर, कोल्हापूर, रायगड, पुणे जिल्ह्यांतील व गोवा राज्यातील नागरी आणि ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी ज्ञान प्रबोधिनीद्वारे योजले जातात.

नेतृत्व करणे ही अशीच एक विशेष क्षमता आहे. विविध वयोगटांत, विविध विषयांमध्ये आणि विविध सामाजिक स्तरांमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींमध्ये नेतृत्व गुण विकसित करण्याची आवश्यकता असते. ज्ञान प्रबोधिनीमध्ये नेतृत्व विकसन हा ही एक महत्त्वाचा विषय अभ्यासला जातो. शालेय वयातील विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्त्व गुणांचा विकास व्हावा यासाठी ' अग्रणी योजना' हा उपक्रम ज्ञान प्रबोधिनीने चालवलेल्या शाळांमध्ये योजला जातो. या उपक्रमाबद्दलची सविस्तर मांडणी या अंकामध्ये आहे.

आज शाळांमध्ये क्रमिक शिक्षणाच्या जोडीने अशा प्रकारच्या एनरिचमेंट कार्यक्रमांची आवश्यकता आहे. आपापल्या शाळांमध्ये चालणाऱ्या अशा कार्यक्रमांबद्दल वाचकांनी जरूर लिहावे !

' प्र' शिक्षकच्या सर्वच वाचकांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

विवेक पोंक्षे

संपादक , ई-प्रशिक्षक

## स्मृतीतून स्फुरो कृती

### कै. डॉ.वि.वि.तथा आप्पा पेंडसे जन्मशताब्दी वर्षे '

ज्ञान प्रबोधिनी या अभिनव शैक्षणिक प्रयोगाची सुरुवात कै. डॉ.वि.वि.तथा आप्पा पेंडसे यांच्या प्रतिभेतून झाली. आप्पांचे शैक्षणिक कार्य व विचार, अभिनव शैक्षणिक प्रयोग यांचा परिचय आपण या लेखमालेत करून घेत आहोत.

"शिक्षण म्हणजे काय चार क्रमिक पुस्तकांचे शिक्षण आहे? शिक्षण हे त्यापेक्षा वेगळे आहे. शिक्षण हे मनुष्यघडणीसाठी, समाजघडणीसाठी आहे. शिक्षणाने राष्ट्र घडायला पाहिजे". कै.आप्पांनी मांडलेले हे सूत्र ज्ञान प्रबोधिनीच्या शैक्षणिक चिंतनाचे मध्यवर्ती सूत्र आहे. आज या सूत्राचा विस्तार करत ज्ञान प्रबोधिनीची वैशिष्ट्यपूर्ण शैक्षणिक अनुभव प्रणाली तयार झाली आहे.

कै.आप्पांनी मांडलेले विचारस्मरण आचारस्फुरण ठरावे यासाठी 'स्मृतीतून स्फुरो कृती' या मालिकेत शिक्षण विचारासोबत ज्ञान प्रबोधिनीत राबवले जाणारे व आपण आपल्या शालेय रचनांत करू शकाल असे शैक्षणिक उपक्रम सुचवत आहोत व निवडक उपक्रमांचा विस्ताराने परिचय या लेखमालेत करून देत आहोत.

# “विचार - स्मरण”

## नेतृत्व - विकसनाचा कार्यक्रम

नेतृत्व विकसन म्हणजे काय या एका प्रश्नाचे नेमके उत्तर देण्याचा प्रयत्न करू या. अनुशासनपूर्ण जीवनाच्या सवयी शिकणे व अंगी बाणविणे, विधायक विचार करणे आणि विधायक रीतीने विचार व्यक्त करणे, आपले मत इतरांना आर्जवपूर्ण पद्धतीने समजावून सांगणे, समाजाच्या व्यापक गरजांसाठी स्वत:च्या गरजा बाजूला सारण्याची वृत्ती घडणे आणि परस्पर-सहकार्याने काम करण्यासाठी आवश्यक असे स्नेहपूर्ण परस्परसंबंध गटामध्ये निर्माण करणे, या सर्व गोष्टी नेतृत्व - विकसनाची पूर्वतयारी म्हणून आवश्यक आहेत. पण त्या पुरेशा नाहीत. त्यानंतर निर्णय घेण्याच्या पद्धती शिकणे आणि निर्णय झाल्यावर सर्वांनी एकजुटीने निर्णयांची कार्यवाही करण्यासाठी कामावर तुटून पडायला शिकणे हे येते. या सर्वांबरोबर नियोजन यशस्वी करण्यासाठी कार्यवाहीची परिणामकारक पद्धत शिकणे, यशापयशाचे अचूक मूल्यमापन करायला शिकणे आणि पुढील कामासाठी गटाला प्रेरणा द्यायला शिकणे हे मिळून नेतृत्वविकसनाच्या कार्यक्रमाचा सर्वसाधारण आराखडा तयार होतो.

नवीन पिढीमध्ये वर उल्लेखलेले नेतृत्व गुण विकसित करण्याचे मार्ग आणि साधने शोधून काढली पाहिजेत. क्रमिक अभ्यासातून आणि अभ्यासक्रमेतर उपक्रमांतून, खेळ,पदभ्रमण, गिर्यारोहण, अभ्याससहली, गटाने मिळून समस्या सोडविणे, देशप्रश्नांवरील व्याख्याने, पथक-पद्धती आणि अग्रणी योजनेचा वापर करणे, इतिहासाचा अभ्यास करणे आणि यासारख्या अन्य अनेक उपक्रमांतून विद्यार्थ्यांना नेतृत्वगुणांचा अर्थ आणि महत्त्व शोधण्याची संधी दिली पाहिजे.

विद्यार्थ्यांना नेतृत्वाची कोणती पद्धत शिकवावी? सर्व प्रसंगी, सर्व गटांसाठी, सर्व स्थळी वापरता येईल अशी एकही पद्धती नाही. कोणत्याच पद्धतीकडे नकारात्मक पूर्वग्रहाने न पाहायला शिकणे हे उपयोगी आहे. लोकशाही, एकाधिकारशाही, सहविचारात्मक नेतृत्वपद्धती या तीन आणि आवश्यक वाटल्यास आणखीही पद्धती तरुणांनी शिकाव्यात आणि एखाद्या उत्तम तंत्रज्ञाप्रमाणे त्या त्या परिस्थितीनुसार योग्य ती पद्धत निवडायला शिकावी हेच श्रेयस्कर होईल.

तथापि सहविचारात्मक नेतृत्वपद्धतीचा सराव करण्यावर भर देणे लाभदायक ठरू शकेल. व्यक्तिगत अभिमानाच्या काळजीपेक्षा गटाच्या ऐक्याची काळजी घ्यायला शिकवले पाहिजे. स्वमताचा आग्रह धरण्यापेक्षा प्रश्न सुटण्याचा आग्रह धरायला शिकवले पाहिजे. व्यक्तिगत हक्क आणि पदसिद्ध विशेषाधिकार यांच्यापेक्षा गटातील आंतरक्रिया आणि व्यक्तिगत व सामूहिक जबाबदारी यांना सहविचारात्मक नेतृत्वपद्धती जास्त महत्त्व देते.

Jnana Prabodhini. A New Experiment in Education—Vol I

( पान 124 वरून अनुवादित)

# आचार - स्फुरण

समाजामध्ये राजकीय नेतृत्वापलीकडे वैचारिक, सामाजिक, आर्थिक, व्यावसायिक, संघटित-असंघटित, अशा विविध क्षेत्रांत नेतृत्वाची गरज असते. सामाजिक प्रश्नांचा अभ्यास करून नेतृत्व करणारे हवे आहेत तसेच राष्ट्रनिर्माणासाठी गरज भासेल अशा विविध क्षेत्रांत नेतृत्व करणारे नेते हवे आहेत. तसेच या संपन्न लोकशाही राष्ट्रात गरज पडेल तेव्हा परिस्थितीचा साकल्याने विचार करून प्रतिसादी उत्स्फूर्तपणे कार्यकर्ता आणि नेता अशा दोन्ही भूमिका नागरिकांना बजावता आल्या पाहिजेत. शालेय वयापासून विद्यार्थ्यांना असे संघटनेचे शिक्षण म्हणजे कार्यकर्ता व नेता म्हणून काम करण्याचे शिक्षण देणे हा कै. आप्पांचा आग्रहाचा शिक्षण विचार राहिला आहे. त्यांच्या स्वत:च्या विद्यावाचस्पती साठीच्या संशोधनाचा विषय नेतृत्व-विकसन हा होता.

आज शालेय स्तरावर वर्गात वर्गप्रतिनिधी म्हणून काम करणे, शालेय परिपाठ, स्नेहसंमेलने या उपक्रमात विद्यार्थ्यांना पुढाकार घेऊन काही मित्रांबरोबर गटात काम करण्याची संधी मिळते. काही शाळांमध्ये विद्यार्थी मंडळे असतात. त्याचे काम करताना पुढारपण करण्याची संधी मिळते. स्काउट-गाईड, एन.सी.सी., आर.एस.पी. सारख्या विशेष योजनांमध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना नेतृत्व आणि अनुशासन या दोन्हीचे अनुभव घेता येतात.

ज्ञान प्रबोधिनीच्या शिक्षण पद्धतीमध्ये विद्यार्थ्यांच्या प्रेरणा जागवणे, त्यांना विविध उपक्रमांत सहभागी होण्याची , जबाबदारी घेण्याची संधी दिली जाते. विद्यार्थ्यांमधील समूहगुण व नेतृत्वगुण विकसित होण्यासाठी गटकार्य आणि जोडीकार्ये, नेतृत्वसंवर्धन तासिका, पथकपद्धती , अग्रणीयोजना यासारखे उपक्रम राबविले जातात. या उपक्रमात सहभागी होताना विद्यार्थ्यांमध्ये समूहभाग, प्रेरणा, स्वयंशिस्त, कामातील उत्स्फूर्तता, निर्णयक्षमता आदीगुणांचा अनुभव घेण्याची संधी मिळते. ज्ञान प्रबोधिनीच्या प्रशाला, छात्रप्रबोधनची उपक्रम केंद्रे या सारख्या औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षण रचनांमध्ये विद्यार्थ्यांना पुढारपण- नेतृत्व करण्याची संधी दिली जाते. यापैकी अग्रणी योजना आणि जोडीकार्य या दोन उपक्रमांचा पुढे विस्ताराने परिचय करून दिला आहे.

## अग्रणी - योजना

**१. अग्रणी संकल्पना**

शाळेमधील सुरू असलेल्या सर्व उपक्रमांची गुणवत्ता वाढावी तसेच उपक्रमांमागची भूमिका व हेतू विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावे यासाठी विद्यार्थी प्रतिनिधींनी पुढाकार घ्यावा ही अग्रणी योजनेची संकल्पना आहे. यातूनच विद्यार्थ्यांमधील नेतृत्व गुण, कौशल्यांची वाढ आणि शाळेतील बेशिस्तीचे प्रमाण कमी करून उत्साह व वातावरणनिर्मिती व्हावी यासाठी इ.८ वी व ९ वी चा विशेष क्षमता असलेला गट निवडून प्रशिक्षण व जबाबदाऱ्या देणे ही योजनेची मूलभूत संकल्पना.

**गरज –** वाढती विद्यार्थीसंख्या व वाढते शिक्षकांवरचे ताण दूर करण्यासाठी अग्रणी योजनेची कार्यवाही असते. शाळेतल्या या अडचणींमुळे शाळेची शिस्त, स्वच्छता, उपक्रमांची संख्या व दर्जा, विद्यार्थी-शिक्षकांचा सहभाग, हेतू याबाबत चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यावरचे अग्रणी योजना हे एक उत्तर आहे असे प्रबोधिनीस वाटते.

**उद्दिष्ट –** शालेय उपक्रमांचा दर्जा वाढणे, विद्यार्थी-अध्यापक-अग्रणी ह्या संबंधातून एखादा छान गट तयार करणे. नेतृत्व-गुण-कौशल्यांचा विकास होणे. ह्या सगळ्यातून शालेय उपक्रमांबाबत उत्साह वाढवून एकूण गुणवत्ता वाढवणे.

**परिणाम –** उपक्रम अधिक नेटका होणे, उपक्रमांमधला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद वाढणे, खेळ-संचलन-कवायत-नृत्यप्रकार-पद्य-उपासना-प्रार्थना इ. सामूहिक बाबींच्या प्रशिक्षणाचा अध्यापकांचा भार हलका होणे या गोष्टी त्यातून साधता येतात. अग्रणी हे विद्यार्थी व शिक्षक यांच्यामधील प्रभावी दुवा म्हणून काम करतात, त्यामुळे विविध उपक्रम व शालेय नियोजनांमध्ये विद्यार्थ्यांची मते विचारात घेता येतात. शिस्त व स्वच्छता सांभाळण्यामध्ये अग्रणींचा मोठाच उपयोग होतो.

याचबरोबर अग्रणी म्हणून निवडलेल्या विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण विकसित होतात. पुढाकार घेऊन काम करण्याची त्यांची वृत्ती वाढते. स्वत:च्या क्षमता वाढवण्याबरोबरच स्वत:च्या पलिकडला, इतरांचाही विचार करायला ते शिकतात. गटात काम करण्याचे कौशल्य वाढते, आत्मविश्वास वाढतो, बोलण्या-चालण्यात धीटपणा येतो. स्वत:चे म्हणणे पटवून देणे, चर्चा करता येणे, मोकळेपणाने संवाद साधणे, उत्स्फूर्त प्रतिसाद देणे, नियोजन करणे याबाबतही विशेष प्रगती होताना दिसते. यातील काही विद्यार्थी शालेय शिक्षण संपवून बाहेर पडल्यावर पुन्हा माजी विद्यार्थी या नात्याने शाळेच्या विविध उपक्रमांमध्ये जबाबदारीपूर्वक सहभागी होतात. नवीन अग्रणींना तयार करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात.

**कार्यवाहीच्या दिशा –**

१) फेब्रुवारी – मार्च महिन्यात इ.आठवीमध्ये शिकत असलेल्या ३०-३५ विद्यार्थ्यांची अग्रणी म्हणून निवड करणे. निवड करताना अभ्यासातील क्रमांक हा एकमेव निकष असू नये. खेळ, संगीत, वक्तृत्व, अन्य स्पर्धा इ.मध्ये विशेष क्षमता असलेल्या, यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांनाही निवडावे त्यासाठी त्या वर्गांना पाचवी ते आठवीमध्ये ज्या शिक्षकांनी शिकवले आहे त्यांना प्रत्येकी ५-१० विद्यार्थ्यांची नावे देण्यास सांगावीत. सर्व आठवीच्या विद्यार्थ्यांसमोर योजना समजावून सांगून ज्यांना यामध्ये सहभागी व्हायचे आहे अशांना नावे देण्यास सांगावीत. अशा पद्धतीने केलेली निवड, कुठल्यातरी क्षेत्रातील विशेष यश व विद्यार्थ्यांची स्वयंस्फूर्तता यामधून योग्य अशा ३० ते ३५ विद्यार्थ्यांची अग्रणी म्हणून निवड करावी. अग्रणी योजना यशस्वी होण्यामध्ये अग्रणींची योग्य निवड होणे खूप महत्त्वाचे आहे. तेव्हा पुरेशा गांभीर्याने व उत्साही शिक्षकांना मदतीला घेऊन ही निवड अंतिम करावी.

२) एप्रिल महिन्यामध्ये आठवीची परीक्षा झाल्यावर ८ दिवसांचे अर्धनिवासी नेतृत्व प्रशिक्षण शिबिर योजावे.

३) जून महिन्यापासून अग्रणी नववीमध्ये गेल्यानंतर पुढील वर्षासाठी प्रत्यक्ष ही योजना कार्यरत करावी. यामध्ये प्रत्येक **अग्रणीकडे ३ जबाबदाऱ्या असतील –**

१) **खातेनिहाय** : शिस्त व स्वच्छता, सांस्कृतिक कार्यक्रम व स्पर्धा, संगीत, समूहगीत, प्रार्थना,पाठांतर, क्रीडास्पर्धा, सामूहिक व्यायाम, नृत्य इ.पैकी एक तरी खाते प्रत्येक अग्रणीकडे असेल, म्हणजे ४-५ अग्रणींमध्ये एक खाते येईल. यापैकी एकजण खात्याचा प्रमुख असेल तर उर्वरित त्याचे साहाय्यक असतील.

२) **वर्गनिहाय** : अग्रणीकडे पाचवी ते दहावीपैकी कोणत्याही एका वर्गाची जबाबदारी असेल. प्रार्थना एकत्रितपणे क्रीडांगणावर होत असल्यास त्यावेळी अथवा एकत्रित कार्यक्रमांच्यावेळी त्या वर्गासोबत त्याने यावे व त्या वर्गाची शिस्त सांभाळावी, तसेच त्या वर्गाशी निगडीत अन्य प्रश्न सोडविण्यास त्याने मदत करावी. कदाचित एका वर्गाला दोन अग्रणीही मिळू शकतील.

३) **पथकनिहाय** : उपस्थितीनुसार संपूर्ण शाळेची ६-८-१२ गटांमध्ये विभागणी करावी. प्रत्येक (गटामध्ये) पथकामध्ये

पाचवी ते दहावीपर्यंतचे सर्व विद्यार्थी असतील. एका पथकात १०० ते १५० विद्यार्थी असतील. मुलांची – मुलींची स्वतंत्र पथके पाडावीत. प्रत्येक अग्रणी कोणत्यातरी पथकात असेल. अग्रणीपैकीच एक जण त्या पथकाचा प्रमुख व एक जण साहाय्यक असेल.शाळेतील काही स्पर्धा, काही कार्यक्रम पथकांप्रमाणे योजावेत. त्यावेळी अग्रणींचा विशेष उपयोग होईल. या प्रमाणे प्रत्येक अग्रणीकडे तीन जबाबदाऱ्या असतील व अपेक्षेप्रमाणे तो त्या त्या ठिकाणी योग्य त्या भूमिका पार पाडेल. ही सर्व योजना यशस्वी व्हायची असेल तर विद्यार्थ्यांची योग्य निवड व त्यांचे प्रशिक्षण या बरोबरच मुख्याध्यापक व अन्य सर्व अध्यापकांचे सहकार्य, सहभाग व पुढाकार खूप महत्त्वाचा आहे. सर्व शिक्षकांना ही योजना समजावून सांगून त्यांना यामध्ये वेळोवेळी सहकार्य करण्यास सांगावे. या योजनेमध्ये रस असलेल्या व विद्यार्थ्यांसाठी जास्तीत जास्त वेळ देऊ शकणाऱ्या, उत्साही २ ते ३ शिक्षकांकडे या योजनेची पूर्ण जबाबदारी सोपवावी. त्यांच्याकडे अन्य जबाबदाऱ्या फारशा देऊ नयेत; कारण ही योजना यशस्वी होण्यासाठी त्यांना खूपच वेळ द्यावा लागणार आहे. या शिक्षकांनी वार्षिक परीक्षेचे उत्तरपत्रिका तपासण्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करून एप्रिलमध्ये अग्रणी प्रशिक्षण शिबिरामध्ये अधिकाधिक वेळ सहभागी व्हावे.

**२. जबाबदाऱ्या,अधिकार, आचारसंहिता, निवड, नियुक्ती-**

**निवड –** एखाद्या विद्यार्थ्याची अग्रणी म्हणून निवड करताना खालील गुणांचा विचार व्हावा.

आदर्श विद्यार्थी, नेतृत्व गुण, स्वयंस्फूर्ती या निकषांवर आधारित नावे विद्यार्थ्यांनी सुचवावी. शिक्षकांकडून याबाबत सूचना घ्याव्यात. याआधारे प्राथमिक यादी करून मुलाखती, गटकार्य, इ मधील चाचण्यांमधून अंतिम निवड करावी.

विद्यार्थी एकातरी बाबतीत निपुण,मदत करणारा, अनेक मित्र जोडणारा, उत्साही, पुढाकार घेणारा असावा. विविध खात्यांसाठी उपयुक्त प्रतिनिधित्व मिळेल असे पाहावे.

**नियुक्ती –** सर्व विद्यार्थ्यांसमोर, जाहीरपणे नियुक्तीचा औपचारिक कार्यक्रम व्हावा. अग्रणींना पवित्र व गंभीर वातावरणात ज्येष्ठ व्यक्तीने प्रतिज्ञा द्यावी.

**प्रतिज्ञा –** नित्यनूतन आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आणि राष्ट्रार्थ पराक्रमाची उत्तुंग कृती हातून घडावी ह्यासाठी आम्ही शिक्षण घेत आहोत. आमचे आई-वडील, गुरुजन आणि भारतीय परंपरेतील ऋषितुल्य आदर्शांचे स्मरण करून आम्ही अग्रणी अशी प्रतिज्ञा करतो की-'आमच्या दैनंदिन जीवनात आम्ही उत्तम अभ्यास करू. उत्तम वाचन करू, खूप खेळ खेळू, शरीर सुदृढ करू, स्वत:मधील नेतृत्वगुणांचे विकसन करू आणि या सर्व गुणांचा उपयोग आमच्या मित्रमैत्रिणींसाठी, शाळेसाठी आणि पर्यायाने समाजासाठी करू, आम्ही सर्व एकदिलाने राहून शाळेतील उपक्रमांमध्ये अध्यापकांना सर्वतोपरी मदत करू. हे कार्य समर्थपणे करता यावे यासाठी आम्ही शिस्तबद्ध, विनम्र,अभ्यासू आणि सदैव उत्साही राहू.'

**अग्रणींच्या जबाबदाऱ्या-**

१) शिक्षक व विद्यार्थी यांच्यामधील दुवा म्हणून काम करणे.

२) शालेय उपक्रम राबविण्यात शिक्षकांचे मदतनीस म्हणून काम करणे.

३) उपक्रमांतील उत्साह व उत्स्फूर्तता वाढवणे.

४) इतरांसमोरील आदर्श, त्यांना तसे बनविण्यासाठी प्रयत्न करणे.

**३. वर्गनिहाय विभागणी व जबाबदाऱ्या**

अग्रणीकडे पाचवी ते दहावीपैकी कोणत्याही एका वर्गाची जबाबदारी असते.कदाचित एका वर्गाला दोन अग्रणीही मिळू शकतात. या अग्रणींनी वर्गशिक्षकांच्या परवानगीने व सहकार्याने जबाबदाऱ्या पार पाडाव्यात.वर्गातील शिस्त व स्वच्छता राखणे, प्रार्थनेच्या वेळी वर्ग शांत ठेवणे, सभा व कार्यक्रमांच्या वेळी रांगा करून घेणे व वर्गावर नियंत्रण ठेवणे, मोकळे तास असताना मुलांचे खेळ व स्पर्धा घेणे, सहलींमध्ये वर्गाबरोबर असणे,वर्गातील छोटे प्रश्न, भांडण, इ. सोडवणे,वर्गातील मुलांची कौशल्ये, विशेष गुण माहीत असणे त्यानुसार याद्या करणे. उदा.संगीत, क्रीडा, वक्तृत्व,इ.

अग्रणींनी त्यांच्या वर्गातील काही निवडक मुलांशी मैत्री करून आपल्याभोवती एक गट तयार करावा. हे त्याचे विविध कामांतील हक्काचे सहकारी, त्यांनी बोलावल्यावर चटकन प्रतिसाद देणारे हवेत. यातून पुढचा गट हळूहळू तयार होईल. अग्रणींना या गटाचे छोटे-मोठे कार्यक्रम स्वतंत्रपणे घेता येतील.

**४. खातेनिहाय विभागणी व जबाबदाऱ्या**

शिस्त व स्वच्छता, सांस्कृतिक कार्यक्रम, स्पर्धा, गीत व समूहगीत, प्रार्थना, पाठांतर, क्रीडास्पर्धा, नृत्य इ.पैकी एकतरी खाते प्रत्येक अग्रणीकडे असावे. म्हणजे ४-५ अग्रणींमध्ये एक खाते येईल. यापैकी एक जण खात्याचा प्रमुख असेल तर उर्वरित साहाय्यक म्हणून असतील.

**खात्याची विभागणी पुढीलप्रमाणे**

१) सांस्कृतिक  २) शिस्त  ३)क्रीडा व स्पर्धा  ४)स्वच्छता-सजावट  ५)संगीत – पद्य  ६)लेखन  ७) वाचन

शाळेच्या आवश्यकतेप्रमाणे खात्यांची यादी व खात्याचे तपशील कमी -जास्त करता येतील. नावे बदलता येतील.

**५. आढावा व प्रशिक्षण**

अग्रणी म्हणून काम करताना विद्यार्थ्यांना इतर काही कौशल्ये अधिक लागतात व ती प्रशिक्षणाने देता येतात. त्यासाठी इतर विद्यार्थ्यांपेक्षा काही वेगळा वेळ विद्यार्थ्यांना द्यावा लागतो. हा वेळ साधारणपणे महिन्यातून एक ते दीड तास असावा.

**आढावा व प्रशिक्षणाचे हेतू –** विद्यार्थ्यांना आठवड्याभरातील / महिन्यातील कार्यक्रमाचे स्वरूप सांगणे व आयोजनात त्यांचा सहभाग वाढवणे, कार्यक्रमांचा हेतू मुलांपर्यंत पोहोचविणे.कार्यक्रमात,उपक्रमात विद्यार्थ्यांना करायला लागणाऱ्या कामाचे स्वरूप व त्याबाबतच्या सूचना, प्रशिक्षण देणे.विद्यार्थ्यांची कामाबाबतची प्रेरणा वाढविणे.नेतृत्वाला आवश्यक अशा कौशल्यांचे प्रशिक्षण देणे.

याशिवाय पुढच्या आठवड्याच्या अथवा महिन्याच्या कार्यक्रमांच्या नियोजनात अग्रणींचे सहाय्य घ्यावे. नवीन कल्पना, सूचना सांगण्यास सांगावे. या साप्ताहिक बैठकीत शाळेतील विविध प्रश्न, अडचणींवर चर्चा व्हावी. पुढे होणाऱ्या उपक्रमांमागचे हेतू, भूमिका,इ.अग्रणींना आवर्जून समजावून सांगाव्यात. विद्यार्थ्यांना त्यांच्यावरील जबाबदारीची पुरेशी जाणीव करून द्यावी. या चर्चांमधून अग्रणींची संवेदना जागृत करणे, विचार सुरू करणे निश्चित व्हावे.

**६. कौशल्य प्रशिक्षण**

**१. नियोजन कौशल्य –** शिक्षकांनी अग्रणींपर्यंत विविध उपक्रमांचे नियोजन आवर्जून पोचवावे. त्या विषयी अनौपचारिक चर्चा व्हावी. त्यांच्या नव्या कल्पनांची दखल घ्यावी.

**२. वक्तृत्व कौशल्य –** या कौशल्याचे अग्रणींना सूचना देणे, प्रस्तावना करणे, सूत्रसंचालन करणे आदी प्रसंगी शिक्षकांनी प्रशिक्षण, संधी व प्रोत्साहन द्यावे.

**३. लेखन कौशल्य –** अग्रणींनी लेखन कौशल्याचे प्रशिक्षण घेऊन त्याचा शाळेतील कामात वापर करावा. उदा. भित्तीपत्रक, सूचनाफलक, पत्रव्यवहार, अहवाल लेखन करणे इत्यादी.

**४. संपर्क कौशल्य –** विविध परिस्थिती सांगून त्यात प्रभावीपणे संपर्क कसा करता येईल याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना करून दाखवण्यास सांगावे व त्याआधारे चर्चा घ्यावी. उदा.निमंत्रण देणे, परवानगी काढणे, खरेदी करणे इत्यादी.

शालेय स्तरावर पुढाकार घेण्याची संधी दिल्याने विद्यार्थ्यांना नेतृत्व करण्याची  वेगवेगळया गटांबरोबर काम करण्याची संधी मिळत असल्याने अग्रणी योजना महत्त्वाची. वर्गप्रतिनिधी (मॉनेटर) यांना वर्गाचे नेतृत्व करण्याची संधी मिळते.  अग्रणींना शालेय स्तरावरचे नेते म्हणून काम करण्याची संधी मिळते. वर्ग प्रतिनिधी (मॉनिटर) योजनेचा पुढचा टप्पा म्हणून आपल्याला अग्रणी योजना शाळेत राबवता येईल. आपल्या शाळेत अग्रणी योजना सुरू करण्यासाठी ज्ञान प्रबोधिनीच्या शैक्षणिक उपक्रम संशोधिकेमार्फत अध्यापक व  विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण - वर्ग घेतले जातात.

# नेतृत्वगुण विकसनासाठी अनुभव शिक्षण

## व्यक्तीकार्ये – जोडीकार्ये – गटकार्ये

वेगवेगळ्या प्रकारची कामे, वेगवेगळ्या ठिकाणी घेतलेले कामाचे अनुभव आणि वेगवेगळ्या गटांबरोबर काम करताना व्यक्तिगत गुणांचे विकसन होतेच पण त्याबरोबर परिस्थिती वा प्रश्नाचे आकलन होणे, वेगवेगळ्या स्वभाव, व्यक्तिमत्व आणि कौशल्य असलेल्या गटाबरोबर काम करण्याचा अनुभव घेता येतो.अशा अनुभव शिक्षणातून समुहात काम करण्याची, समूहाबरोबर काम करण्याची आणि समूहाचे नेतृत्व करण्याची कौशल्ये विकसित होतात.

क्रमिक अभ्यास व अभ्यासेतर कार्यामधून नेतृत्वगुण विकसित करण्याचे अनेक मार्ग व संधी शालेय रचनेत उपलब्ध असते. क्रमिक शिक्षणात विषय मंडळे जसे विज्ञान, इतिहास मंडळे, वर्गामधील विद्यार्थ्यांचे विषय अभ्यासगट, अभ्यासात अडचणी असलेल्या विद्यार्थ्यांसाठी समवयस्क मार्गदर्शक असे अनेक उपक्रम विद्यार्थ्यांना क्रमिक अभ्यासातील नेतृत्व करण्याची संधी देतात. या रचनांबरोबरच अभ्यासपूरक कार्ये म्हणून ज्ञान प्रबोधिनीत व्यक्तीकार्ये ,जोडीकार्ये आणि गट कार्ये शिक्षण पद्धतीचा भाग म्हणून योजली जातात. समूहगुण विकसन व नेतृत्वाचा सराव करण्यासाठी या कार्यांचा उपयोग होतो.

## व्यक्तिकार्ये

व्यक्तिगत कौशल्यांचा विकास, अनुभव संपन्न होण्यासाठी व्यक्तिकार्यांचा उपयोग होतो. शिक्षणाची आणि अनुभव घेण्याची आस वाढवण्यासाठी, आवड निर्माण होण्यासाठी विद्यार्थ्यांना वेगवेगळी व्यक्तिकार्ये ज्ञान प्रबोधिनीत दिली जातात.

**व्यक्तिकार्यांची उदाहरणे**

१)आपल्या कुटुंबाचा ३ ते ५ पिढ्यांचा कुटुंबवृक्ष तयार करा.

२) घरच्यांसाठी सर्वांना पुरेल एवढा खाद्य पदार्थ तयार करा.त्यासाठी आवश्यक ते साहित्य विकत आणा.

३) नारळ सोलणे, ताक घुसळणे, वीज बिल भरणे, फ्रिज साफ करणे, वाहन/पंखे पुसणे या सारखी घरातील किमान पाच कामे करण्यासाठी आईला मदत करा.

४) घरातील प्रथमोपचाराची पेटी तयार करा. त्यावर औषधाचे नाव, उपयोग, पद्धत आणि एक्सपायरीडेट इ. तक्ता लावा.

५) एक महिनाभर घरातील ओल्या व सुक्या कचऱ्याचे व्यवस्थापन करा.

## जोडीकार्ये

एकमेकांबरोबर काम करता येणे, दुसऱ्यांच्या मताचा आदर करणे, प्रसंगी आपले म्हणणे पटवून सांगता येणे, दिलेले काम पूर्ण करतायेणे, एकमेकांबरोबरची मैत्री, विश्वास वाढणे यासाठी जोडीकार्याचा उपयोग होतो. अभ्यास व अभ्यासपूरक कौशल्यांसाठी जोडीकार्यांची योजना शैक्षणिक अनुभव घेण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरणा देतात. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वविकसनासाठी ज्ञान प्रबोधिनीत दिली जाणारी नमुनादखल जोडीकार्ये

१) शुभेच्छापत्रे, वर्तमान पत्राच्या पिशव्या / आकाशकंदिल तयार करून विकणे व नफा मिळवणे.

२) वेगवेगळया पाच व्यावसायिकांना भेटून त्यांच्या व्यवसायाची माहिती मिळवणे.

३) एसटी / रेल्वेचे आरक्षण करणे व रद्द करणे.

४) महिन्यातील एक दिवस सायंकाळी ५ ते ७ सार्वजनिक बागेत जाऊन कागद / प्लॅस्टिक गोळा करणे.

५) बाजारपेठेतील किमान ५० दुकानांची यादी करून वर्गीकरण करणे.

## गटकार्ये

गटात काम करणे व गटाकडून काम करून घेता येणे हे आजच्या काळातील महत्त्वाचे कौशल्य आहे. समूहाबरोबर राहता येणे, इतरांची मते ऐकणे, आपले मत पटवून देणे , गटात पुढाकार घेणे, समस्या सोडवणे, योग्य निर्णय घेण्याची क्षमता विकसित करणे अशा अनेक व्यक्ती आणि समुह गुणांचा विकास करण्यासाठी ज्ञान प्रबोधिनीच्या शिक्षण पद्धतीत गटकार्य एक प्रमुख साधन म्हणून वापरले जाते. विविध शिबिरांमध्ये दिल्या जाणाऱ्या गटकार्यांबरोबर शालेय वेळापत्रकात गटकार्याच्या विशेष तासाची योजना करून ५ वी ते १० वी च्या गटातील विद्यार्थ्यांची गटात काम करण्याची कौशल्ये विकसित करण्याचे प्रयोग झाले आहेत. गटकार्यात गटाला देण्याच्या कामाबरोबर गटात काम करताना विद्यार्थ्यांची निरीक्षणे नोंदवणे व कार्य पूर्ण झाल्यावर विद्यार्थ्यांबरोबर गटकार्यातील त्यांचे अनुभव व निरीक्षकाची निरीक्षणे यावर चर्चा घडवणे व विद्यार्थ्यांना त्याबद्दल फिडबॅक देणे महत्त्वाचे आहे.

वेगवेगळया प्रकारची गटकार्ये विद्यार्थ्यांना देता येतील. यासाठी एकाच वर्गातील विद्यार्थ्यांचे गट करणे, वेगवेगळया वर्गातील / इयत्तांमधील विद्यार्थ्यांचे उभे गट करणे अशा विविध पद्धती वापरल्याने गटकार्याचा - या शैक्षणिक साधनाचा अनुभव शिक्षणात उपयोग होतो.

१) परिसरातील पुतळयाबद्दल माहिती मिळवा. पुतळा व त्याचा परिसर स्वच्छ करा. एक छोटी सभा भरवून लोकांना त्या व्यक्तीच्या कार्याची माहिती सांगा.

२) एका तासात शाळेतील विविध पाट्या स्वच्छ करून सुशोभन करा.

३) तुमचे गाव पाहण्यासाठी दोन दिवसांची सहल योजायची आहे त्याचे नियोजन करून माहितीपत्रक तयार करा.

४) सोसायटीतील / गावातील १५ मुलांना गोळा करून त्यांचा चार तासांचा मेळावा घ्या.

५) तुमच्या घराची / सोसायटीची / गावातील इमारतीची प्रतिकृती तयार करा.

## विकसता विकसता विकसावे.....

उन्हाळयाची सुट्टी लागली आणि मी एखाद्या आगळयावेगळया शिबिराचा शोध घेत होते. मग मला ज्ञान प्रबोधिनीतील ' छात्र प्रबोधन' मधून जोडीकार्य उपक्रमाबद्दल कळलं. जोडीकार्य म्हणजेच जोडीने केलेलं कार्य. आता कार्य म्हटल्यावर परत रटाळपणे काम करायचं असं तुम्हाला वाटत असेल तर ते तसं अजिबात नाही. आपल्याला ' छात्र प्रबोधन' मधल्या ताई सात आव्हानात्मक कामं सांगीतली. ती कामं आपण आपल्या मैत्रिणी किंवा मित्राबरोबर जोडीने पूर्ण करायची. दोघांनी मिळून ही कामं पूर्ण केली , की मग तीन दिवसाची साहस सहल. मंजिरी हिनं ही काम पूर्ण केली.

' आव्हानात्मक' शब्द ऐकल्यावरच ठरवलं की ही सात कामं पूर्ण करूनच दाखवायची. ठरवल्याप्रमाणे मी आणि माझी मैत्रीण जोडीनं काम करतांना आम्हाला खूप मजा आली.पहिल्यांदा आम्हाला १०० रू.चा डी.डी. काढायला सांगितला होता आणि तोही कोणा मोठ्यांची मदत न घेता. मग बँकेत जाऊन, डी.डी.कसा काढायचा याची चौकशी करून आम्ही डी.डी.काढला. तेव्हाच आम्हाला पहिलं काम दिलं गेलं.

पहिलं काम होतं **विक्रीकार्य**, ज्यामध्ये आम्हाला फुलांचे गजरे किंवा एखादं सरबत स्वत: बनवून एखाद्या अनोळखी ठिकाणी विकायचं होतं, त्यामुळे आमचं विक्री कौशल्य दिसून येणार होतं. आम्ही लिंबू सरबत विकायचं ठरवलं. सगळा अंदाज घेऊन २५ ग्लास लिंबू सरबत बनवलं मग ते सरबत, ग्लास घेऊन आम्ही चतु:श्रृंगी मंदिराच्या पायथ्याशी जाऊन बसलो. सकाळी दहा वाजता गेलो होतो, तेव्हा डोंगरावर फिरायला जाणारे, देवीच्या दर्शनाला आलेले लोक, उन्हातून खाली उतरल्यावर दमून ते थंडगार सरबत घेतील असा आमचा अंदाज होता, पण त्यादिवशी लोक कमी होते. आणि जे होते ते सरबत घेतच नव्हते. आता मात्र आमची सहनशक्ती संपली. शेवटचा प्रयत्न म्हणून थोड्या जिद्दीनं व चिकाटीनं आम्ही येणाऱ्या लोकांना हाका मारून बोलवायला सुरुवात केली.तेव्हा मात्र काहींनी आमच्याकडून सरबत घेतलं. काही जण ' नाही' म्हटल्यावर खूप राग यायचा, चिडचिड व्हायची, पण तरी चिकाटीने आम्ही असे पंचवीसच्या पंचवीस ग्लास प्रत्येकी १० रू.प्रमाणे विकले. आम्हाला थोडा नफा झाला त्यामुळे आम्ही खूप खूष झालो. अशा प्रकारे पहिलं काम चिकाटीनं पार पडलं.

दुसरं काम आम्हाला दिलं; ते म्हणजे शैक्षणिक क्षेत्रातील तीन शाखा म्हणजेच Science, Arts आणि Commerce यांचे प्राध्यापक शोधून त्यांची **मुलाखत घेण्याचे.** प्राध्यापकाकडून त्या तीन शाखांबद्दल माहिती मिळवायची होती. हे वाटत होतं तेवढ सोप्प नव्हतं.कारण प्राध्यापक शोधून त्यांच्या वेळेनुसार काम होणार होतं. त्यामुळे ' तीन दिवसांत होईल' , असं वाटलेल्या कामाला आम्हाला दोन आठवडे लागले. परंतु आमच्या सर्व शंका दूर होऊन प्राध्यापकांकडून आम्हाला सविस्तर माहिती मिळाली.

नंतर आम्ही तिसरं काम मागितलं. तिसऱ्या कामात आम्हाला पाच वेगवेगळया घरी जाऊन त्यांच्या धान्य साठवण्याच्या पद्धती विचारायच्या होत्या. एका आजीचं खूप मोठ्ठ शेत आहे. त्या म्हणाल्या की त्या शेतात जमिनीलगत खूप मोठा खड्डा खणतात. तो शेणानं आतून लिंपतात आणि त्यात धान्य साठवतात. त्यालाच ' कणगी' असं म्हणतात. एक मोठ्ठ पिंप घेऊन त्यात धान्य साठवतात, त्याला ' पेव' असे म्हणतात. अशाच अनेक वेगवेगळया पद्धती जाणून घ्यायला आम्हाला मजा आली.

आम्हाला चौथं काम शिवाजीनगर रेल्वे स्टेशन ते आमचं घर हा रस्ता प्रमाणबद्ध अधली-मधली सर्व ठिकाणं दाखवून काढायचा होता. काम ऐकल्यावर खूप सोप्पं वाटलं पण रस्ता प्रमाणबद्ध काढणे, सर्व ठिकाणांची माहिती करून घेणे या गोष्टींना बराच वेळ लागला. पण त्यामुळे आम्हाला रस्त्यांची माहिती झाली.

आम्हाला पाचवं काम स्वयंपाककृती असं होतं, ज्यामध्ये आम्हाला दोघींना मिळून एक गोड आणि एक तिखट पदार्थ बनवायचा होता.

सहावं काम आमच्या आईवडिलांच्या मागील तीन पिढ्यांची माहिती लिहिण्याचं होतं हे काम किचकट असलं, तरी त्यामुळे आम्हाला आमच्या मागच्या पिढ्यांबद्दल माहिती मिळाली.

सातवं काम होत इव्हेंट मॅनेजमेंटचं, ज्यामध्ये एका आजींच्या सत्तरीसाठी कार्यक्रम आयोजित करायचा होता, डेकोरेशन, केटरिंग, हार आणणे, करमणूक कार्यक्रम व त्याचबरोबर मांडव इ.गोष्टींचे , कार्यक्रमांचे आयोजन केले. हे सर्वांत अवघड काम होतं; पण त्यामुळे आम्हाला जबाबदारीचं भान आलं, वेळेचं महत्त्व कळलं, खूप काही शिकायला मिळालं.

सगळी कामं करताना अनेक अडथळे आले. भरपूर कष्ट करावे लागले, अडचणी आल्या; पण त्यावर मात करून काम पूर्ण करण्यात खरी मजा येत होती. या उपक्रमातून आम्हाला खूप काही शिकायला मिळालं, जबाबदारीचं भान आलं. आमचा आत्मविश्वास वाढला. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे एकमेकींना सांभाळत, कधी दुसऱ्याच्या मतांचा विचारांचा आदर करत, तर कधी आपलं म्हणणं पटवून देऊन काम कसं पूर्ण करायचं हे शिकता आलं. या कामांचा आम्ही दोघींनीही आनंद लुटला.

कु.सानिका कुलकर्णी

निर्मिती होरायझन, औंध, पुणे-७

# ते अंकुर आम्ही वाढवितो तळहाती

जे कर्तृत्वाने जिंकतील ही धरती
ते अंकुर आम्ही वाढवितो तळहाती ॥ धृ ॥

कुणि हसरे, रूसके, लाघवि कुणि लडिवाळ
कुणि स्पर्शू पाहती नभ हे नील- विशाल
कुणि अबोल, उत्कट, कुणि तर्काची धार
कुणि तिखट, तेज जणु शिवबाची तलवार

परि सर्वारूपी नटला तो जगजेठी
ते अंकुर आम्ही वाढवितो तळहाती ॥ १ ॥

फुलण्यास यांजला माती संस्कारांची
प्रेमाचे पाणी, ऊब सूर्यकिरणांची
जिज्ञासा यांची शोधि अथांग, अनंत
अन् पराक्रमाला अपुरे यांस दिगन्त

विश्वाला भिजविल करूणा अैसी चित्ती
ते अंकुर आम्ही वाढवितो तळहाती ॥ २॥

हे इतिहासाची नवीन लिहितिल पाने
अशुभाची येथुन पुसतील नावनिशाणे
हे नव्हेत छोटे, हे तर युगनिर्माते
हे मायभूमिचे भावी भाग्यविधाते

शौर्याने अपुल्या नमवितील जे नियती
ते अंकुर आम्ही वाढवितो तळहाती ॥ ३॥

याहून कोणते श्रेय अम्ही इच्छावे ?
वा अन्य प्रकारे भगवन्तास भजावे ?
राधा - मनमोहन अन्य कुणा मानावे ?
अन कोणावरुनी जीवन ओवाळावे ?

धन - वान खरोखर तृणवत् त्यांच्यापुढती
ते अंकुर आम्ही वाढवितो तळहाती ॥ ४ ॥

ज्ञान प्रबोधिनी शैक्षणिक साधन केंद्र
पत्ता : 'विनायक भवन', ५१४ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.
दूरभाष : २४२०७१९३, २४२०७१९४
ई – मेल : erc@jnanaprabodhini.org
Visit us at : www.erc-pune.org